Marathwad Shikshan Prasarak Mandal's

# Vinayakrao Patil Mahavidyalaya Vaijapur

## Departtment of Sociology

# Gender Inequality: A Survey


Researcher

**DR. SAHEBRAO HIWALE**

Associate Professor

Department of Sociology

Vinayakrao Patil Mahavidyalaya


Academic Year: 2021-2022

# लिंगभाव असमानता : एक अध्ययन

**प्रस्तावना** :-भारतीय समाजाच्या प्राचीन इतिहास काळापासूनची सामाजिक परिस्थिती लक्ष्यात घेतली तर समाजाच्या विविध स्थित्यंतर काळात स्त्रियांच्या दर्जाविषयक अनेक बदलत्या अवस्था दिसून येतात. आरंभीच्या वैदिक काळात स्त्री-पुरुष समानता असल्याचा उल्लेख अनेक ठिकाणी सापडतो. परंतु त्यानंतरची परिस्थिती मात्र विचारणीय आहे.

सरंजामशाहीचा काळ व परकीय आक्रमणे यामुळे तर स्त्रियांचे स्वातंत्र्यापूर्णपणे संकुचित झाले होते. परंतु आता ते सर्व संपले, इतिहास जमा झाले आहे. समाज आधुनिक युगात वावरत आहे असे स्पटीकरण स्वामी रंगनाथानंद आधुनिक युगातील स्त्रियांच्या संदर्भात करतात तेव्हा पुन्हा एकदा स्त्रियांचा दर्जा तपासून पहावसा वाटतो. त्यासाठी प्रस्तुत अध्ययनाचा प्रयत्न करण्यात आला आहे. समाजशास्त्राया नियमाप्रमाणे व्यक्ती व समाजांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी सामाजिक संस्थांची भूमिका महत्वाची मानली जाते. समाजाचा सामाजिक आणि जैविक दृष्टया महत्वाचा अर्धाभाग म्हणजे स्त्री आणि उर्वरित पुरुष होय. समाज सातत्य टिकून ठेवण्यासाठी स्त्री-पुरुष या दोघांचे महत्व एकमेकांपेक्षा किंचितही कमी अधिक नाही. म्हणजे मूलतः जैविक भेद बाजूला ठेवला तर स्त्री-पुरुष समानच आहे. यासंबंधी महात्मा फुले यांचे विचारही महत्वाचे ठरतात. त्यांनी अखंड या काव्य रचनेमध्ये स्त्री-पुरुष यांचा उल्लेख 'मानव' असाच केलेला आहे. याचा अर्थ दोघांनाही मानवतेच्या स्तरावर समान वागणूक व समान दर्जा अपेक्षित आहे.

सैध्दांतिक स्तरावर स्त्री-पुरुष समानतेचे अनेक उदाहरणे देता येईलही पण वास्तवता काय आहे ? याचा विचार करणे अधिक संयुक्तिक ठरेल त्यादृष्टीने विचार केला तर 'स्त्री' जन्म एक संकट मानले जाते, असाही समाजात प्रघात दिसतो. अर्थात बदलती सामाजिक स्थिती, विपथगमण, सामाजिक नियंत्रणाची शिथिलता या सारखे अनेक कारणे आहेत की त्यामुळे 'स्त्री' या घटकांकडे बघण्याचा दृष्टीकोनच पूर्णतः बदलून गेला आहे. असे असले तरी ज्या दांपत्याचा पोटी केवळ 'स्त्री' लिंगीय अपत्य आहे. त्याची मानसिकता काय आहे, स्त्री या घटकांकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा आहे? या सर्व बाबींचा उलगडा करण्यासाठी मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून प्राथमिक स्वरुपाची माहिती संकलित करुन, सदर माहितीवर सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्रीय प्रक्रिया करुन त्यांचे सामान्य विधानात रुपांतर करण्याचा एक प्रयत्न या ठिकाणी करण्यात आलेला आहे.

**संकलित माहितीचे विश्लेषण** :-गंगापूर परिसरातील सर्व समावेशक सामाजिक घटकांतील लोकांचा म्हणजेच ज्यांना अपत्य म्हणून केवळ 'स्त्री' लिंगी अपत्य आहे (मुलगा नाहीच)अशा पालकांची सहेतुक पध्दतीने नमुना निवड

करुन मुलगा-मुलगी समान आहे का? या समस्येविषयी मानसिकता व प्रवृत्ती जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

अ) उत्तरदात्यांची वैयक्तिक माहिती :-

प्रस्तुत अध्ययनासाठी एकूण साठ एककांची नमुना म्हणून निवड करण्यात आली होती. सदर एककांची वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे :

**तक्ता क्र.१**

**वयोगट निहाय माहिती**

| अ.क्र. | वयोगट | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २०ते ३० | १४ | २३.३३ |
| २. | ३१ ते ४० | १८ | ३०.०० |
| ३. | ४१ ते ५० | १५ | २५.०० |
| ४. | ५१ ते अधिक | १३ | २१.६७ |
| ५. | एकूण | ६० | १०० |

वरील तक्त्यावरुन असे लक्ष्यात येते की, वयोगटाची ज्या गटात विभागणी केलेली आहेत त्या सर्वच वयोगटाला समानतेच्या जवळ जाणारे प्रतिनिधीत्व मिळालेले आहे. परंतु सर्वाधिक उत्तरदाते ३१ ते ४० वर्ष वयोगट यातील दिसून आले त्याचप्रमाणे ३०% टक्के इतके आहे.

उत्तरदात्यांची जमाती व जातिनिहाय माहितीसुध्दा संकलित करण्यात आली. त्यामध्ये मराठा, धनगर, न्हावी, माळी, सुतार, धोबी, ब्राह्मणत्तेर जमातींना सुध्दा प्रतिनिधित्व देण्यात आल्याचे आढळून आले. त्यामध्ये कोकणी, भिल्ल, शिक्कलकरी, इत्यादी तसेच १०% एकक तर जात न मानणारे आढळून आले. यांचा अर्थ आधुनिक समाजात जातीभेद कमी होत आहे असे दिसून येते.

**तक्ता क्र.२**

**धर्मनिहाय माहिती :**

| धर्म | हिन्दू | बौध्द | जैन | इस्लाम | ख्रिश्चन | शीख | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वारंवारिता | ५६ | --- | ०१ | ०२ | १ | --- | ६० |
| टक्केवारी | ९३.३३ | --- | १.६७ | ३.३३ | १.६७ | ---- | १०० |

प्रस्तुत अध्ययनासाठी निवडलेले एकक सर्वाधिक म्हणजे ९३.३३ टक्के हिन्दू धर्मीय असल्याचे दिसून आले तर इस्लाम व जैन धर्मीय १.६७ टक्के आणि बौध्द व शीख धर्माचा एकही उत्तरदाता आढळून आला नाही.

**शैक्षणिक माहिती**

**तक्ता क्र.३**

| शिक्षण | इ.१० वी | इ.१२ वी | पदवी | पदव्युत्तर | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| वारंवारिता | २८ | १५ | ०६ | ०३ | ०८ | ६० |
| टक्केवारी | ४६.६७ | २५ | १० | ५ | १३.३३ | १०० |

भारतीय लोकसंख्येच्या शिक्षणविषयक घटकाचा विचार करता येथील सन २०११ च्या जनगणतेनुसार, साक्षरता दर ७३ टक्के आहे म्हणजेच आजही २७टक्के लोक शिक्षणापासून वंचित आहे परंतु सदर अध्ययनासाठी निवडण्यात आलेल्या उत्तरदात्यांपैकी सर्वच उत्तरदाते हे साक्षर असल्याचे दिसून आले व त्यांची शैक्षणिक पात्रता, इ.१० वी पर्यंतचे ४६.६७ टक्के, इ.१२ वी पर्यंत २५ टक्के, पदवी १० टक्के, पदव्युत्तर ५टक्के व इतर की ज्यामध्ये डि.एड. व तत्सम व्यावसायिक शिक्षणाचा समावेश होतो असे उत्तरदाते १३.३३ अक्के आढळून आले. यावरुन असे स्पष्ट होते की सर्वाधिक शिक्षण असलेले उत्तरदाते हे इ.१० वी उत्तीर्ण असल्याचे दिसून आले.

**व्यावसायिक माहिती**

**तक्ता क्र.४**

| व्यवसाय | शेती | नोकरी | व्यापार | पारंपारिक व्यवसाय | गृहिणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| **वारंवारिता** | ३१ | ०७ | ०४ | ०७ | ११ | ६० |
| **टक्केवारी** | ५१.६७ | ११.६७ | ०६.६७ | ११.६७ | १८.३३ | १०० |

भारत देश कृषी प्रधानतेकडून उद्योग प्रधानतेकडे वाटचाल करता आहे असे म्हटले जाते, असे असले तरी ग्रामीण भागाचा मुख्य व्यवसाय शेती आहे हे प्रस्तुत अध्ययनावरुन पुन्हा एकदा सिध्द होते म्हणजेच अध्ययनादरम्यान ५१.६७ टक्के उत्तरदाते हे शेती व्यवसायाशी संबंधीत असल्याचे दिसून आले. ११.६७ उत्तरदाते हे पारंपारिक व्यवसाय व अन्य नोकरी करत असल्याचे दिसून आले. पारंपारिक व्यवसाय म्हणजेच न्हावी काम, धोबी व तत्सम जाती अधारित व्यवसायाचा यामध्ये समावेश आहे. ६.६७ टक्के उत्तरदाते हे व्यापारी वर्गातील आढळून आले तर १८.३३टक्के उत्तरदाते गृहिणी असल्याचे दिसून आले. अर्थात हे सर्व स्त्री लिंगीय उत्तरदाते आहेत.

**कुंटुंब नियोजन शस्त्रक्रिया विषयी माहिती :-**

भारतीय संस्कृती व विशेषतः हिन्दू धर्म तत्वज्ञान व मोक्ष प्राप्तीसाठी पुत्रप्राप्ती आवश्यक सांगितली आहे. तेव्हा वंशाचा दिवा म्हणून पुत्रप्राप्तीचे महत्व हिंदू धर्मात आधुनिक समाजात देखील दिसून येते त्यासाठी अनेकदा संतती नियमन व कुंटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली जात नाही. प्रस्तुत अध्ययनातून काही आकडेवारी समोर आली आहे ती खालीलप्रमाणे.

कुंटूंब नियोजन शस्त्रक्रिया केली आहे काय? असा प्रश्न विचारला तेव्हा तेव्हा ६३.३३ टक्के उत्तरदात्यांनी कुंटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली असल्याचे दिसून आले म्हणजेच या उत्तरदात्यांनी वंशाच्या दिव्याचा व पुत्रप्राप्तीचा विचार केलेला दिसून येत नाही. ३६.६७टक्के उत्तरदात्यांनी कुंटूंबनियोजन शस्त्रक्रिया केलेली नसली तर ते कुंटुंबनियोजनाच्या अन्य साधनांचा वापर करुन त्यांनी पाळणा थांबविलेला आहे. कारण कुंटुंबाच्या आकारावरुन ही बाब सहज लक्ष्यात येते.

**कुंटूंबाचा आकार :**

५१.६७ उत्तरदात्याचे कुंटुंब हे लहान कुंटूंब असल्याचे दिसून आले. म्हणजेच त्यांच्या कुंटुंबातील सदस्य संख्या ४ किंवा ४ पेक्षा कमी आहे. २५ टक्के उत्तरदायांच्या कुंटूंबातील सदस्य संख्या ५ (पाच) इतकी तर १० टक्के उत्तरदात्याच्या कुंटूंबातील सदस्य संख्या ६ सदस्य व केवळ १३.३३ टक्के उत्तरदात्यांच्या कुंटुंबातील सदस्य संख्या मात्र सहा किंवा सहापेक्षा अधिक असल्याचे आढळून आले.

भारतात विविध धर्माचे अनुयायी असले तरी बहुतांश हिंदू धर्मीय आहेत त्यामुळे साहजिकच भारतीय जीवन पध्दतीवर हिंदू धर्म संस्कृतीचा, धर्मग्रंथाचा प्रभाव अधिक आहे. पुरुष प्रधान संस्कृती ही हिंदू धर्माचे नेतृत्व करते यांचे दाखले व प्रमाण 'मनुस्मृती' सारख्या ग्रंथातून निश्चितच मिळते. 'मनुस्मृती' भारतीय समाज व्यवस्थेच्या पायाभूत शक्तीचे प्रतिक आहे. ती पायाभूत शक्ती म्हणजे पुरुषसत्ता होय आणि पुरुषसत्ता म्हणजे स्त्रियांवर आर्थिक शोषण आणि दडपशाही पुरुषांची सत्ता होय''. पुरुष सत्ता म्हणजे, कुंटूंबसंस्था, समाज आणि उत्पादन व्यवस्था यात पुरुषांना सत्तेचे आणि शोषणाचे स्थान देणारी व्यवस्था''.

अशा या बुरसटलेल्या समाज व्यवस्थेच्या उत्तर समाजव्यवस्थेत अपत्य म्हणून मुलगी असावी असा निर्णय घेणे व तो कोणी घ्यावा या विषयी समोर आलेली माहिती खालील तक्त्यावरुन स्पष्ट होईल.

**तक्ता क्र. ५**

**अपत्य म्हणून मुलगी असावी असा निर्णय कोण घेतला या विषयी माहिती**

| अ.क्र. | निर्णय घेणारे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पती पत्नी मिळून | ४७ | ७८.३३ |
| २. | इतर नातेवाईक | ०४ | ०६.६७ |
| ३. | कोणीही नाही | ०९ | १५.०० |
| ४. | एकूण | ६० | १०० |

वरील तक्त्यावरुन असे लक्ष्यात येते की, ७८.३३ टक्के पती-पत्नी आपणांस अपत्य रुपी मुलगी किंवा मुलगी असली असतांनाही समाधानी आहेत. ०६.६७ टक्के लोकांना इतर नातेवाईकांचा आधार आहेत तर १५ टक्के उत्तरदाते या विषयी माहित नाही असे उत्तर देतात.

वंशाला दिवा म्हणून मुलगा नाही परंतु मुलगी किंवा मुलीच आहेत व अशा परिस्थिती संतती नियमन व कुंटुंब नियोजनासारखा निर्णय घेतांना नातेवाईक व कुंटुंबातील इतर लोकांचा पाठिंबा कशा प्रकारे आहे याची माहिती खालील तक्त्यावरुन होईल.

**तक्ता क्र.६**

**मुलगी किंवा मुलीच अपत्य असावे या निर्णयास पांठिबा देणारे या विषयी माहिती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | पांठिबा देणारे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आई वडील | ३५ | ५८.३३ |
| २. | भाऊ- बहीण | ०३ | ०५ |
| ३. | इतर नातेवाईक | ०४ | ६.६७ |
| ४. | कोणीही नाही | १८ | ३०.०० |
| ५. | एकूण | ६० | १००.०० |

केवळ मुली किंवा मुलगी अपत्य म्हणून असावी अशा परिस्थिती दाम्पत्यांना त्यांचे आई-वडील पूर्णपणे पाठिंबा देतात. प्रस्तुत अध्ययनात ५८.३३ टक्के उत्तरदात्यांचे आईवडील त्यांना अशा परिस्थितीत पाठिंबा देतात. ५% उत्तरदात्यांना भाऊ किंवा बहीण पाठिंबा देतात तर ६.६७टक्के उत्तरदात्यांना इतर नातेवाईकांचा पाठिंबा असल्याचे दिसून आले. एकंदरीत ७० टक्के उत्तरदात्यांना कोणत्या न कोणत्या नातेवाईकांचा पाठिंबा असल्याचे दिसून आले तर केवळ ३० टक्के उत्तरदात्यांनाच कोणीही अशा प्रकारचा पाठिंबा देत नसल्याचे आढळून आले.

**मुलींच्या विवाहाच्या नियोजनाविषयी माहिती :-**

हिन्दू धर्म तत्वज्ञानानुसार सोळा संस्कार महत्वाचे मानले जातात. त्यापैकी 'विवाह संस्कार' हा अतिशय महत्वाचा संस्कार मानल्या जातो. अन्य धर्मात देखील विवाह ही घटना महत्वाची आहे, किंबहुना एकंदरीत मानवी जीवनातच विवाहाचे स्थान महत्वाचे आहे. विशेषतः मुलांचा विवाह म्हणजे आई-वडिलांचासाठी अनेक अर्थाने महत्वाचा असतो. त्यामुळे अनेकदा यास एक संकट मानून त्यातून आपली सुटका करवून घेण्यासाठी किंवा आर्थिक परिस्थिती अभावी अयोग्य स्वरुपाचे निर्णय विवाहाच्या संबंधी घेतले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. अध्ययनातून या विषयी समोर आलेली माहिती पुढील तक्त्यावरुन स्पष्ट होईल.

**तक्ता क्र.७**

**मुलींच्या विवाहाचे नियोजन विषयी माहिती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | विवाहाचे नियोजन | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | शिक्षण संपल्यावर | २६ | ४३.३३ |
| २. | नोकरी / व्यवसाय सुरु केल्यावर | ०४ | ०६.६७ |
| ३. | योग्य वयात | २४ | ४०.०० |
| ४. | विचार केला नाही | ०६ | १०.०० |
| | एकूण | ६० | १००.०० |

ज्या दांपत्याना केवळ मुलगी किंवा मुलीच आहेत अशा उत्तरदात्यापैकी ४३.३३ टक्के उत्तरदात्ये त्यांच्या मुलींचे विवाह शिक्षण पूर्ण झाल्यानंतर करणार आहे. म्हणजे या वरुन असे सिध्द होते कही, ४३.३३ टक्के पालकांना स्त्री-शिक्षणाचे महत्व पटलेले आहे व त्यांनी तो अधिकार त्यांच्या मुलींना देण्याचे ठरविले आहे. ६.६७टक्के पालक त्यांच्या मुलींच्या विवाहापेक्षा करीअरला महत्व देतांना दिसतात. ४० टक्के पालकांना त्याच्या मुलीचा विवाह ठरवितांना मुलींचे योग्य वय हा विषय महत्वाचा वाटतो तर १० टक्के पालकांनी मुलीच्या विवाहाविषयी कसल्याही प्रकारचा विचार केलेला नाही असे दिसून येते.

भारताने लोकशाही शासनपध्दतीचा स्वीकार केलेला असून प्रत्येक भारतीय नागरिकांना मानवाधिकार व मूलभूत अधिकार या सारखे महत्वाचे स्वातंत्र्य व संरक्षण दिलेले आहे. तरी सुध्दा पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव पूर्णपणे झुगारुन देण्यात समाज पूर्णपणे यशस्वी ठरलेले नाही. विशेषतः महिलांना त्यांच्या स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याचे स्वातंत्र्य देखील संस्कृतीच्या नावाखाली नाकारण्यात आलेले आहे. ज्या जोडीदारासोबत संपूर्ण जीवन व्यतीत करावयाचे आहे त्यांची निवड करण्याचे स्वातंत्र्य देखील स्त्रियांना पूर्णतः दिलेले दिसून येत नाही.

## तक्ता क्र.८

### वैवाहिक जोडीदार निवडीबाबत माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | निर्णय घेणारे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पालकांस योग्य वाटेल असा | ३३ | ५५.०० |
| २. | मुलीच्या पसंतीप्रमाणे | १९ | ३१.६७ |
| ३. | घरजावई म्हणून तयार असणारा | ०० | ००.०० |
| ४. | सांगता येत नाही | ०८ | १३.३३ |
| **एकूण** | | ६० | १००.०० |

वरील तक्त्यावरुन, असे स्पष्ट होते की, ५५ टक्के उत्तरदाते त्यांना योग्य वाटेल असाच वैवाहिक जोडीदार त्यांच्या मुलींसाठी निवडणार आहेत. म्हणजेच यावरुन असे स्पष्ट होते की, ५५ टक्के पालक आजही त्यांच्या मुलींना वैवाहिक जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य देऊ इच्छित नाही. ३१.६७ टक्के पालक मात्र त्यांच्या मुलींना वैवाहिक जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य देऊ इच्छितात. घरजावई म्हणून तयार असणारा वैवाहिक जोडीदार एकाही उत्तरदात्यांना नको आहे. तर १३.३३टक्के पालकांनी या प्रश्नाविषयी काहीही सांगता येत नाही असे उत्तर दिले.

स्त्री अबला आहे, ती स्वतःचे संरक्षण करु शकत नाही अशीच पुरुष प्रधान समाजाची धारणा राहिली आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यात वडील नंतर पती व शेवटी मुलगा यांच्या अधीन राहून स्त्री जीवन जगत आली आहे. त्यातच संरक्षणाच्या दृष्टीने भावाची भूमिका सुध्दा महत्वाचीच वाटते. परंतु आधुनिक समाजामध्ये मुलगी-मुलगा असा अपत्य समतोल साधने कितपत योग्य आहे. या दृष्टीने विचार करता खालील माहिती समोर येते. अध्ययना दरम्यान उत्तरदात्यांना मुलींना पाठिंबा म्हणून आणखी भावंडे असायला हवी काय? असा प्रश्न विचारला तेव्हा जास्तीत जास्त उत्तरदाते म्हणतात, की अशी गरज कधीच वाटत नाही.

## तक्ता क्र.९

मुलींना पाठिंबा म्हणून आणखी भावंडे असायला हवी काय? हे दर्शविणारा तक्ता .

| अ.क्र. | व्यक्त झालेले मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कधीच वाटत नाही | ३३ | ५५% |
| २. | सतत वाटते | ०१ | १.६७% |
| ३. | कधी-कधी वाटते | १८ | ३०.००% |
| ४. | तटस्थ | ०८ | १३.३३% |
| **एकूण** | | ६० | १००.००% |

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, ५५ टक्के उत्तरदाते आहे त्या अपत्यप्रती समाधानी आहे, पाठिंबा म्हणून आणखी भावंडे असावे असे त्यांना कधीच वाटत नाही. १.६७ टक्के उत्तरदात्यांना मात्र सतत वाटते, ३० टक्के उत्तरदात्यांना कधी-कधी वाटते तर १३.३३ टक्के उत्तरदाते या प्रश्नांचे उत्तर देण्याचे टाळतात. म्हणजेच तटस्थ भूमिका घेतात.

**वारसाधिकार :-**

पितृसत्ताक कुंटुंब पध्दतीमध्ये वंश पित्याच्या नावाने चालतो व संपत्तीचा उत्तराधिकारी हा मुलगा ठरतो असे असले तर कायद्याची चौकट मात्र आता मुलींना सुध्दा हा अधिकार प्राप्त करुन देण्यात समर्थ आहे. परंतु प्रत्यक्षात संस्कृती आणि परंपरा यांचा प्रभाव अधिक असतो. अशा परिस्थितीत ज्या दाम्पत्यांना वंशाचा उत्तराधिकारी म्हणून मुलगा नाही त्यांची संपत्ती कोण सांभाळणार व वारसदार कोण होईल? या विषयी माहिती पुढील तक्त्यावरुन स्पष्ट होईल.

**तक्ता क्र.१०**

**वारसदाराविषयी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | व्यक्त झालेले मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मुलगी | ५६ | ९३.३३% |
| २. | जावई | ०० | ००.०० |
| ३. | इतर नातेवाईक | ०२ | ३.३३% |
| ४. | विश्वस्त संस्था | ०२ | ३.३३% |
| | **एकूण** | ६० | १०० |

उपरोक्त आकडेवारीवरुन असे स्पष्ट होते की, ९३.३३% उत्तरदाते वारसाधिकारी म्हणून त्यांच्या मुलींचीच निवड करणारा आहेत. जावयास वारसदार म्हणून निवडण्यासाठी एकही उत्तरदाता तयार नाही. तर ३.३३ % उत्तरदाते त्यांच्या संपत्तीचा वारसदार म्हणून इतर नातेवाईकांची निवड करणार आहे असे निर्दशास आले तर एवढेच (३.३३%) उत्तरदाते त्यांची संपत्ती विश्वस्थ संस्थेला देणार आहे.

**कौटुंबिक जबाबदारी पार पाडण्यातील समर्थत :-**

वारसदाराच्या रुपाने मुलगीच आहे तेव्हा कौटुंबिक जबाबदारी पार पाडण्याचे कार्य सुध्दा मुलीलाच करावे लागेल परंतु या विषयी त्यांच्या पालकांचे मत काय आहे? हे सुध्दा विचारात घेणे महत्वाचे ठरले त्या अनुषंगाने मुलगी मुलाप्रमाणे कौटुबिक जबाबदारी पार पाडण्यास सक्षम असते काय? असा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा त्यास खालील प्रमाणे प्रतिसाद प्राप्त झाला.

**तक्ता क्र.११**

**कौटुंबिक जबाबदारी पेलण्यास मुलींची समर्थता दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ४८ | ८०.०० |
| २. | नाही | १० | १६.६७ |
| ३. | काही प्रमाणात | ०२ | ३.३३ |
| | **एकूण** | ६० | **१००.००** |

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, ८०% उत्तरदाते असे म्हणतात की, मुली सुध्दा मुलाप्रमाणे कौटुंबिक जबाबदारी पेलण्यास समर्थ असते, १६.६७% उत्तरदाते म्हणतात की, समर्थ नसतात तर ३.३३% उत्तरदाते म्हणतात की, काही प्रमाणात मुली -मुलाप्रमाणे कौटुंबिक जबाबदारी पेलण्यास समर्थ असतात.

मागील एक-दोन दशकापासून मीडीया, चित्रपट इत्यादींच्या प्रभावामुळे महिला अत्याचार, बलात्कार इत्यादीसारख्या सामाजिक समस्येंची तीव्रता व वारंवारिता वाढत चाललेली आहे याची प्रचिती दररोजच्या वृत्तमानपत्रातून येत आहे अशा परिस्थितीत मुलींचे पालक म्हणून कुठेतरी असुरक्षितपणाची जाणीव होणे साहजिकच आहे परंतु जेव्हा प्रस्तुत अध्ययनात असा प्रश्न विचारला तेव्हा त्यास मिळालेला प्रतिसाद मात्र विचार करण्यासारख आहे तो खालील तक्त्यावरुन स्पष्ट होईल.

**तक्ता क्र.१२**

**मुलींचे पालक म्हणून असुरक्षित वाटते काय? या विषयी माहिती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ०८ | १३.३३ |
| २. | नाही | ४६ | ७६.६७ |
| ३. | मुळीच नाही | ०६ | १०.०० |
| | **एकूण** | ६० | **१००.००** |

केवळ १३.३३% मुलींच्या पालकांनाच त्यांच्या मुलींच्या जीवनाबद्दल असुरक्षितता वाटते, १०% पालकांना तर मुळीच असुरक्षित वाटत नाही. तर ७६.६७% पालकांना सुध्दा सुरक्षिततेबद्दल काळजी वाटत नसल्याचे दिसून येते.

सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील लिंगगुणोत्तर प्रमाण (Sex Ratio) प्रति एक हजार पुरुषामागे ९४३ स्त्रिया असे आहे. महाराष्ट्राचे ९२९ व औरंगाबादचे ९२३ इतके आहे. म्हणजे स्त्री-पुरुष यांचा

लोकसंख्या शास्त्रीयदृष्टया विचार केला तर आजही स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी असल्याचे दिसून येते. त्यामुळे ज्या दाम्पत्यांना अपत्य म्हणून केवळ मुलींच आहेत अशा दाम्पत्यांना या मुलींच्या घटत्या प्रमाणामुळे काय वाटते? याचे विवेचन पुढील माहिती वरुन करता येईल.

**तक्ता क्र.१३**

**मुलींच्या घटत्या प्रमाणावर प्रतिक्रिया दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | प्रतिक्रिया | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | असुरक्षितता | २६ | ४३.३३ |
| २. | मुलींची काळजी | ०८ | १३.३३ |
| ३. | मुलांची काळजी | २६ | ४३.३३ |
| | एकूण | ६० | १००.०० |

४३.३३% उत्तरदात्यांना मुलींच्या घटत्या प्रमाणामुळे असुरक्षितता वाटते तर तेवढयाच उत्तरदात्यांना मुलांची काळजी वाटते. कारण मुलींच्या घटत्या प्रमाणामुळे वैवाहिक जोडीदार मिळणे कठीण होईल त्यामुळे अशा मुलांची काळजी वाटते. तर १३.३३ % उत्तरदात्यांना मात्र मुलींचीच काळजी वाटते.

म्हणजेच ७६.६७ उत्तरदात्यांना मुलींचे पालक म्हणून असुरक्षित वाटत नाही. तेव्हा हे पालक (उत्तरदाते)त्यांच्या मुलींना मुलासारख्या स्वातंत्रसोयी सुविधा उपलब्ध करुन देतात काय? या विषयी जी माहिती समोर आलेली आहे ती खालील तक्त्यावरुन स्पष्ट होईल.

**तक्ता क्र.१४**

**मुलींना मुलाप्रमाणेच स्वातंत्र सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या**

| अ.क्र. | उत्तरदाते | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ५६ | ९३.३३ |
| २. | नाही | ०३ | ०५.०० |
| ३. | देऊ शकत नाही | ०१ | ०१.६७ |
| | एकूण | ६० | १००.०० |

मुलींना मुलाप्रमाणे स्वातंत्र्य सोयीसुविध उपलब्ध करुन देणाऱ्या पालक उत्तरदात्याचे प्रमाण ९३.३३% इतके आहेत. ५% उत्तरदाते अशा सुविधा उपलब्ध करुन देऊ शकत नाही तर १.६७% उत्तरदाते मुलींना -मुला समान मानत नाही व तशा सोयी सुविधा उपलब्ध करुन देत नाही. परंतु या वरुन असे स्पष्ट होते की, बहुतांश म्हणजे ९३.३३% उत्तरदाते मुलगी-मुलगा समान मानतात. तेव्हा वंशाला दिवा म्हणून मुलगा नाही त्यामुळे

अपराधीपणा वाटतो काय ? असा प्रश्न विचारला तर एकाही उत्तरदात्याला अपराधीपणा वाटत नाही. परंतु ५% उत्तरदात्यांना कमीपणा वाटतो तर ९५% उत्तरदात्यांना काहीच वाटत म्हणजे ते अशा प्रश्नाला महत्व देत नाही याचा अर्थ स्त्री-पुरुष समानता विचार त्यांना पटलेला आहे.

**निष्कर्ष :-**

उत्तरदात्याकडून संकलित केलेल्या तथ्यांच्या विश्लेषणावरुन प्रस्तुत निष्कर्षाचे प्रतिपादन करण्यात आलेले आहे.

१) अपत्य म्हणून केवळ मुलीच असेल तर अशा वेळी कुंटुंब नियोजनाचा निर्णय पती-पत्नी दोघे मिळून घेतात.

२) मुलगी / मुलीच अपत्य असेल तर आई-वडीलांच्या पाठिंबा असल्याचे प्रमाण ५८.३३% इतके आहे.

३) मुलींच्या विवाहाचे नियोजन करतांना शिक्षण आणि योग्य वय या दोन्ही घटकाला महत्व देण्यात येते.

४) मुलींसाठी वैवाहिक जोडीदार निवडतांना मुलींची पसंती व पालकांची निवड या दोन घटकांना अधिक महत्व दिले जाते.

५) ५५% उत्तरदात्ये स्त्री लिंगी अपत्यांच्याप संदर्भात समाधानी आहेत.

६) ९३.३३% उत्तरदाते त्यांच्या संपत्तीचा वारसदार म्हणून मुलीचीच निवड करणार असल्याचे दिसून आले.

७) कौटुंबिक जबाबदारी पेलण्यास मुलाप्रमाणे मुली समर्थ आहेत असे ८०% उत्तरदाते सांगतात.

८) मुलींचे पालक म्हणून ८६.६७% उत्तरदात्यांना असुरक्षितता मुळीच वाटत नाही.

९) मुलगा नसेल तर मुलींना पालक मुलाप्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध करुन देतात.

१०) वंशाला दिवा नसल्यामुळे एकाही उत्तरदात्याला अपराधीपणा वाटत नाही. उलट अभिमानाच वाटतो.

❖❖❖❖❖